# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७४७ दिनांक १६/१०/२०२०

## फेक इंस्टाग्राम अकाऊंट तयार करुन अश्लिल मॅसेज करणा-या आरोपीतास केळवा सागरी पोलीसांकडुन अटक

इंस्टाग्राम या सोशल नेटवर्कवर फेक इंस्टाग्राम अकाऊंट तयार करुन त्यावरुन सुंदर दिसणा-या मुलींचे अकाऊंटवर अश्लिल मॅसेज पाठवुन त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणा-या अज्ञात आरोपी विरुद्ध केळवा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ३४/२०२० भा.द.वि.स. कलम ३५४(डी), माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी), ६७ (ऐ) प्रमाणे गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयातील आरोपीचा कोणताही पुरावा नसतांना त्यास सायबर सेल, पालघर यांचेशी समन्वय साधुन आरोपीस सातारा जिल्हयात जावुन त्याचा शोध घेवुन त्यास दि.१५/१०/२०२० रोजी अटक करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.दशरथ पाटील, पोलीस निरीक्षक पालघर पोलीस ठाणे हे करित असुन सदर गुन्हयातील आरोपीत यांस सायबर सेल पालघर यांचे कडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीताचा शोध घेवुन आरोपी नामे सोहन सुरेश डेरे, वय-२५ वर्षे, रा.कवठे, ता.वाई, जि.सातारा यास अटक करण्यास श्री.मानसिंग पाटील, प्रभारी अधिकारी केळवा सागरी पोलीस ठाणे, सफौज/प्रविण वडे, पोना/भिमराव सिरसाट, पाशि/सोमनाथ घनवट, पोशि/जयदीप सांबरे यांनी मोलाची कामगिरी केली आहे.